**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्तविभाग**

**राष्ट्रीय बातमीपत्र**

**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांक:26.04.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला,**

**केंद्र सरकारकडून 'नीती आयोग'ची पुनर्रचना, अर्थतज्ज्ञ अशोक कुमार लाहिरी आयोगाचे उपाध्यक्ष**

**शहरांच्या विकासासाठी येत्या चार वर्षात अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत एक लाख कोटी रुपये खर्च होणार**

**डीआरडीओच्या प्रगत आर्मड् प्लॅटफार्मचं महाराष्ट्रात अहिल्यानगर इथं अनावरण**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या एका कार्यक्रमात गोळीबार, ट्रम्प सुरक्षित, कोणतीही जीवितहानी नाही.**

**आणि**

**महिला क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा विजय**

**आता सविस्तर बातम्या**

**पश्चिमबंगालनिवडणूक मतदान टक्केवारी**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला पोचला असून, विविध राजकीय पक्षांचे प्रमुख प्रचारक पदफेऱ्या, प्रचार फेऱ्या आणि जाहीर सभांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करताहेत. पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज विविध उमेदवारांच्या समनार्थ प्रचार सभांना संबोधित कऱणार आहेत. भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री यांनी काल पूर्व बर्धमान जिल्ह्यातील एका प्रचार सभेत, भाजपची सत्ता आल्यास राज्यात समान नागरी संहिता लागू केली आणि सातवा वेतन आयोग आणला जाईल असं आश्वासन दिलं. त्याचबरोबर भाजपचे नेते राजनाथ सिंह, जे. पी नड्डा तसंच योगी आदित्यनाथ, हेमंत बिस्वा सरमा तसंच भाजप प्रदेशाध्यक्ष नितीन नवीन यांनीही काल प्रचारात सहभाग घेतला. त्याचबरोबर, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा

ममता बॅनर्जी यांनीही काल प्रचारसभा घेतली. तर तृणमूल नेते अभिषेक बॅनर्जी यांनीही प्रचार सभा घेतल्या. त्याचबरोबर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही तीन ठिकाणी प्रचार सभांना संबोधित केलं.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदानाची छाननी केल्यानंतर मतदानाच्या टक्केवारीत आणखी वाढ झाली असून ९३ पूर्णांक १९ टक्के अंतिम आकडेवारी नोंदवली गेली आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा इतकं विक्रमी मतदान झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<u>लाहीरी</u>**

केंद्र सरकारने 'नीती आयोग'ची पुनर्रचना केली असून अर्थतज्ज्ञ अशोक कुमार लाहिरी यांची आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्याचे उपाध्यक्ष सुमन के. बेरी यांची जागा घेतील. लाहिरी यांच्यासोबतच, सरकारने राजीव गौबा, प्रा. के. व्ही. राजू, प्रा. गोवर्धन दास, डॉ. एम. श्रीनिवास आणि प्रा. अभय करंदीकर यांची नीती आयोगाचे पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. लाहीरी यांनी काल मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी त्यांचं अभिनंदन केलं. लाहिरी यांचे प्रयत्न देशातील धोरण-निर्मिती प्रक्रियेत नवचैतन्य निर्माण करतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला आहे.

**<u>सीतारामनसेबी</u>**

सर्वसामान्य नागरिकांसाठी ग्राहक ओळख प्रक्रिया म्हणजेच केवायसी प्रक्रिया अधिक सुलभ कऱण्यासाटठी एकत्रिक काम कऱण्याचं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. मुंबईत काल सेबीच्या ३८व्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात अर्थमंत्री सहभागी झाल्या होत्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. कोणत्याही नागरिकांना विविध वित्तीय उत्पादनं आणि व्यासपीठावर पडताळणीची प्रक्रिया वारंवार करावी लागू नये हे सुनिश्चित करण्याची संबंधितांची सामायिक करण्याची जबाबदारी असल्याचंही अर्थमंत्री यावेळी बोलताना म्हणाल्या. याच कार्यक्रमात सेबीच्या जागरूक या गुंतवणूकदार जागरूकता उपक्रमाचा शुभारंभही त्यांनी केला.

**<u>लालहुडको</u>**

शहरांच्या विकासासाठी येत्या चार वर्षात केंद्र सरकार अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत एक लाख कोटी रुपये खर्च करणार असल्याचं केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांनी म्हटलं आहे. दिल्लीत काल गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळ लिमिटेड

म्हणजेच हुडकोच्या ५६ व्या स्थापना दिनाच्या सोहळ्यात ते बोलत होते. या फंडाला नुकतीच मंजूर देण्यात आली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. हुडको स्थापनेपासून शहरी विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट धोरणाअंतर्गत गृहनिर्माण प्रकल्प तसंच मेट्रोची कनेक्टिव्हिटी सुधारणा होणार असल्याचं त्यांना सांगितलं. पुढील २० वर्षांत शहरी विकासावर सुमारे सत्तर लाख कोटी रुपये खर्च केले जाण्याची अपेक्षा असल्याचंही ते म्हणाले.

**<u>रणगाडा-35अहिल्यानगर4</u>**

संरक्षण संशोधन विकास संस्था म्हणजेच DRDO आणि वाहन संशोधन आणि विकास प्रतिष्ठान म्हणजेच VRDE यांनी संयुक्तपणे विकसित केलेल्या 'विक्रम VT-21' या ट्रॅक्ड आणि व्हील्ड अशा दोन्ही प्रकारांतील अत्याधुनिक आर्मर्ड प्लॅटफॉर्मचं अनावरण काल अहिल्यानगर इथल्या व्हीआरडीईमध्ये करण्यात आलं. डीआरडीओचे अध्यक्ष डॉ समीर कामत यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. एकच वेळी क्षेपणास्त्र आणि लष्करी जवान अशा दोघांनाही वाहून नेण्याची क्षमता या वाहनांमध्ये आहे. अवघ्या तीन वर्षांमध्ये या दोन वाहनांची निर्मिती करण्यात आली असून ती सध्या प्रायोगिक तत्त्वावर केली आहे. भविष्यात लष्करामध्ये आवश्यक असलेले बदल आणि आवश्यक साधनांच्या वापरासाठी या वाहनांची निर्मिती केली जाणार आहे. भारत फोर्ज आणि टाटा ॲडव्हान्स सिस्टिम्सच्या सहकार्याने या वाहनांची निर्मिती करण्यात आली आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे.

**<u>ट्रम्पहल्ला</u>**

अमेरिकेत एका हॉटेलमध्ये वार्ताहरांच्या मेजवानी प्रसंगी गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प आणि त्यांच्या पत्नी तसंच अमेरिकेच्या पहिल्या महिला नागरिक मेलनिया ट्रम्प उपस्थित होते, त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं आहे. हल्लेखोराला सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतलं असल्याचं ट्रम्प यांनी समाज माध्यमांवरील संदेशात नमूद केलं असून, सिक्रेट सर्विस आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांच्या जलद प्रतिसादासाठी कौतुकही केलं. हल्ल्यात कोणीही जखमी झालं नसल्याचं वृत्त आहे. प्रशासनाने आजूबाजूचे रस्ते बंद केले असून, परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**इराण-अमेरिका**

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची, रशियाच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी ओमानमधून पुन्हा एकदा पाकिस्तानला भेट देऊ शकतात. त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्या पुन्हा एकदा अप्रत्यक्ष चर्चा होण्याची शक्यता असल्याचा अंदाज व्यक्त होतो आहे. पाकिस्तानच्या सर्वोच्च नेत्यांशी चर्चा करून तसेच युद्ध कायमस्वरूपी संपवण्यासाठी तेहरानच्या मागण्या सामाईक केल्यानंतर अराघची परत गेले. त्यामुळे अमेरिकेशी सुरू असलेल्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीविषयी अनिश्चितता निर्माण झाली आहे. याविषयी चर्चेत पुढे जाण्याची आम्ही व्यवहार्य रस्ता निवडला आहे मात्र अमेरिकेच्या मुत्सद्देगिरीविषयी सांशकता व्यक्त करत इराणच्या मंत्र्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. दरम्यान अराघची यांनी पाकिस्तान सोडल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे मुत्सद्दी स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कशनर इराण समवेत चर्चेसाठी इस्लामाबादेत जाणार नसल्याचं जाहीर केलं. चर्चेसाठी लागणारा अधिक प्रवास वेळ, खर्च आणि इराणकडून वरिष्ठस्तरीय नेत्यांना सहभाग नसल्यानं हा दौरा रद्द केल्याचं ट्रम्प यांनी समाज माध्यमांवरील एका संदेशात म्हटलं आहे.

**प.आशियाएलपीजीइराण**

देशभरात पेट्रोलियम उत्पादनं आणि एलपीजी यांची सातत्यपूर्ण उपलब्धता सुनिश्चित कऱण्यासाठी सरकारनं अनेक पावलं उचलली आहे, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं दिली आहे. घरगुती वापराच्या इंधन पुरवठ्याला प्राधान्य असून, कोणत्याही एलजीपी वितरक केंद्रावर साठा संपल्याची अथवा तुटवडा भासल्याची तक्रार नोंदवली गेली नसल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे. देशात ऑनलाईन एलपीजी सिलेंडर आगाऊ नोंदणीचे प्रमाण ९९ टक्क्यांपर्यंत वाढलं आहे. तर ओटीपी आधारित वितऱणाचं प्रमाणही ९४ टक्क्यांहून अधिक झालं आहे.

**कोलंबियाहल्ला**

कोलंबियामध्ये एका प्रवासी बसमध्ये स्फोट झाल्यानं सात जणांचा मृत्यू तर १७हून अधिक लोक जखमी झाले. प्रवास सुरू असताना यातील स्फोटक यंत्रणा कार्यान्वित झाल्यानं ही घटना घडली. कोलंबियाच्या सशस्त्र दलाचे कमांडर जनरल ह्युगो लोपेझ यांनी, दहशतवादी कृत्य असं या स्फोटाचं वर्णन केलं असून जैमे मार्टिनेझ हा गट यासाठी जबाबदार असल्याचं म्हटलं आहे.

**महिलाT20**

महिला क्रिकेटमध्ये जोहान्सबर्ग येथे काल रात्री झालेल्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताने दीप्ती शर्माने अष्टपैलू खेळाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना १४ धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना भारताने १८५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला ९ बाद १७१ धावा करता आल्या. दीप्ती शर्माने कारकीर्दीतील 5 बळी मिळवत सर्वोत्तम कामगिरी केली. तिला 'सामनावीर' पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**IPLएन्गिडीदुखापत**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल दिल्ली इथं झालेल्या पहिल्या सामन्यात पंजाब किंग्जस इलेव्हंन संघाने दिल्ली कॅपिटल्सचा 6 गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सने 264 धावा फलकावर लावल्या. प्रत्युत्तरादाखल पंजाबने हे आव्हान 7 चेंडू राखून पूर्ण केलं. या सामन्यादरम्यान दिल्ली कॅपिटल्सचा वेगवान गोलंदाज लुंगी एन्गिडीला डोक्याला दुखापत झाल्यामुळे रुग्णवाहिकेतून मैदानाबाहेर नेत उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री जयपूर इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाने राजस्थान रॉयल्सचा 5 गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने 229 धावांचं आव्हान उभं केलं होतं. हैद्राबाद संघाने ते 9 चेंडू राखून पार केलं. इशान किशनला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या.**

**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला,**

**केंद्र सरकारकडून 'नीती आयोग'ची पुनर्रचना, अर्थतज्ज्ञ अशोक कुमार लाहिरी आयोगाचे उपाध्यक्ष**

**शहरांच्या विकासासाठी येत्या चार वर्षात अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत एक लाख कोटी रुपये खर्च होणार**

**डीआरडीओच्या प्रगत आर्मड् प्लॅटफार्मचं महाराष्ट्रात अहिल्यानगर इथं अनावरण**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या एका कार्यक्रमात गोळीबार, ट्रम्प सुरक्षित, कोणतीही जीवितहानी नाही.**

**आणि**

**महिला क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा विजय**

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**